राज्यातील अतिवृष्टी व पूर यामुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांना अन्नधान्य वाटप करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०१८/प्र.क्र. २२५/म -३,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- ०८ मार्च, २०१९.

वाचा :

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस ५९८३/२४८३६१/प्र.क्र.८२०/म-३, दि.३१.०१.१९८३

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दि.१३.५.२०१५

प्रस्तावना:-

राज्यात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे मोठया प्रमाणात कुटुंबे निराधार होतात. सदर आपत्कालीन परिस्थितीत त्यांना तातडीने अन्नधान्याची मदत देणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच, राज्यात अनेक वेळा अतिवृष्टी व पूर परिस्थिती निर्माण होऊन अनेक कुटुंबे निराधार झाल्यामुळे निराधारांना अन्नधान्याचे वाटप करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून आल्यामुळे अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे. या सर्वबाबींचा सर्वकष विचार करून, दि.१३ मे, २०१५ च्या शासन निर्णयात देय असलेल्या मदतीव्यतिरिक्त अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे बाधित आपदग्रस्तांना अन्नधान्याची मदत देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अतिवृष्टी व पुरामुळे आपत्कालीन परिस्थिती उदभवून २ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी क्षेत्र पाण्यात बुडाले असल्यास/घरे पूर्णत: वाहून गेली असल्यास / पूर्णत: क्षतीग्रस्त झाली असल्यास त्यामुळे निराधार होणा-या कुटुंबाना प्रति कुटुंब १० किलो गहू , १० किलो तांदुळ व ५ लिटर केरोसिन मोफत पुरविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. अन्नधान्य व केरोसिनच्या वाटपाचे काम अतिवृष्टी व पुरामुळे आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यानंतरच्या एका आठवडयात पूर्ण करण्यात यावे.

३. उपरोक्त परिस्थिती उदभवल्यानंतर निराधार झालेल्या कुटुंबियांना दयावयाच्या अन्नधान्य व केरोसिन याची मागणी संबंधित जिल्हाधिकारी यांनी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे नोंदवावी व त्यानुसार अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने पुरवठा करावा.

४. ज्या आपदग्रस्तांना मदत दयावयाची आहे, त्यांनी मदत छावणीमध्ये आश्रय घेतला नसल्याचे जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित करावे.

५. या प्रयोजनार्थ होणारा खर्च " २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य (योजनेत्तर) (०२) पूर, चक्रीवादळे,इ. , १०१, अनुग्रह सहाय्य (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांव्यतिरिक्त खर्च (९२) (०६) राहत केंद्रामध्ये निवारा, अन्न, वस्त्र, औषधे इत्यादींचा पुरवठा (२२४५ २२४७) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतूदींमधून भागविण्यात यावा.

६. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४४२/व्यय-९/२०१८, दिनांक - १९/१२/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१८३३११४८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.03.08 18:35:08 +05'30'

(सु. ह. उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व आयुक्त, महानगरपालिका
५) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई ३०
६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
८) महालेखापाल -१/२ (लेखाअनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर (प्रत्येकी ३ प्रती)
९) महालेखापाल -१/२ (लेखापरिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर (प्रत्येकी ३ प्रती)
१०) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई-३२
११) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) सर्व मंत्रालयीन विभाग,
१३) महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने,
१४) उपसचिव, (आव्यप्र-१/आव्यप्र-२/म-७/म-११/ब-१/पीएसी/पीएसी-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई
१५) वित्त विभाग (व्यय-९ /व्यय-३/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-६), मंत्रालय, मुंबई.
१६) म-३ कार्यासन (निवडनस्ती).

<u>प्रत माहितीसाठी अग्रेषित</u>

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अप्पर मुख्य सचिव

२) मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव

३) मा.राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव.